# प्रेस नोट ता. २७/०६/२०२०

## अवैद्ध गुटखा विक्रेत्यावर गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवडचा छापा, जप्त केला ०१,११,०५६/- रुपये किंमतीचा गुटखा

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दित कोणत्याही प्रकारे मानवी जिवीतास हनिकारक असलेला गुटखा, तंबाखु व तत्सम पदार्थांची विक्री होता कामा नये व असे क`त्य करणाऱ्या इसमांवर कडक कारवाई करण्याचे मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी सर्व पोलीस ठाणे व गुन्हे शाखा यांना दिले होते.

त्या अनुशंगाने दि. २७/०६/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे यांच्या आदेशान्वये सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/२५० जाधव, पोहवा/ ५१७ दळे, पोना/ ९१६ शेटे, पोना/ ११४२ आढारी, पोशि/ २१०२ सैद असे वाकड पोलीस ठाणे हद्दित गस्त घालत असताना बातमी मिळाली की, इसम नामे अजमत सलीम पठाण याने त्याच्या राहत्या घरात सर्व्हे नंबर- १२/६, भोर्डे नगर, थेरगाव, पिंपरी चिंचवड या ठिकाणी पान मसाला व सुगंधीत तंबाखुचा विक्री करिता साठा केला आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुशंगाने सदर स्टाफने वरील ठिकाणी छापा घातला असता सदर इसमाच्या घरात गुटखा व तंबाखु सद`श पदार्थाचा मोठा साठा मिळुन आला. सदर पथकाने लागलीच याबाबत मा. सहायक आयुक्त (अन्न) अन्न व औषध प्रशासन विभाग, औंध,पुणे यांना सदर बाबत माहिती दिल्यावर तेथील अन्न व सुरक्षा अधिकारी श्री. ए. एस. धुळे यांनी सदर ठिकाणी येवुन खात्री करुन ०१,११,०५६/- रु. किं. चा गुटखा व तंबाखु सद`श पदार्थाचा साठा जप्त केला. सदर आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ व भारतीय दंड सहिता कलम १८८, ३२८, २७२, २७३ नुसार वाकड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील, (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ नारायण जाधव, संजय गवारे, प्रविण दळे, धर्मराज आवटे, अदिनाथ मिसाळ, पोना/ संतोष असवले, लक्ष्मण आढारी, मोहम्मद गौस नदाफ, तुषार शेटे, वासुदेव मुंढे पोशि/शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, तुषार काळे, सुखदेव गावंडे गुन्हे शाखा युनिट-४ यांनी केली आहे.

